“बचत गटामुळे आदिवासी महिलांच्या जीवनात झालेले सामाजिक व आर्थिक बदल”

(विशेष संदर्भ-पालघर जिल्हा) (कालखंड :-2012-2022)

पी.एच.डी.(अर्थशास्त्र) पदवी नोंदणीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंध आराखडा

संशोधक

श्री. राहुल प्रकाश बनसोडे

(M. A., NET)

मार्गदर्शक

डॉ. माधव पी. पलमंटे

(M. A., Ph. D.)

श्रीमती. सुशीलादेवी देशमुख महाविद्यालय, लातूर

सादर स्थळ

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अनुक्रमणिका

अ. क्र	विवरण	पृष्ठक्रमांक
1	प्रस्तावनाः	3
2	संशोधनाची उद्दिष्टे	6
3	संशोधन गृहितके	7
4	संशोधन पद्धती	8
5	शोध आराखड्याची प्रकरण निहाय रचना	9
6	संदर्भ साहित्य सूची	10

"बचत गटामुळे आदिवासी महिलांच्या जीवनात झालेले सामाजिक व आर्थिक बदल"
(विशेष संदर्भ-पालघर जिल्हा) (कालखंड :-2012-2022)

● प्रस्तावना:

जागतिक शहर म्हणून ज्याची ओळख आहे, आणि आपल्या भारताची आर्थिक राजधानी, मुंबईपासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेला हा नवीन जिल्हा, तो आजही विकासापासून कोसो दूर आहे. तसेच या भागातील लोकांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक असा कोणताही आघाडीवर ठळकपणे विकास निदर्शनास येत नाही, म्हणून मूळचा पालघर तालुका हा ठाणे जिल्ह्यातील एक अविभाज्य भाग होता, पुढे ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्ह्याची निर्मिती ही एक ऑगस्ट 2014 रोजी करण्यात आली. या निर्मितीचा मुख्य उद्देश हा या भागातील आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा असा होता. परंतु जिल्ह्याची निर्मिती होऊन ही म्हणावा त्या पद्धतीने येथील आदिवासी समाजाचा विकास झाल्याचे काही निदर्शनास येत नाही, किंबहुना ते प्रकर्षाने जाणवत नाही. पालघर जिल्ह्यामध्ये आठ तालुके आहेत. त्या तालुक्यांचं निरीक्षण केले असता, डोंगरी,सागरी आणि नागरी या घटकात विभागलेले आहेत. विक्रमगड, जव्हार, मोखाडा, तलासरी, वाडा हे तालुके आदिवासी बहुल आहेत. तर पालघर, वसई, डहाणू हे नागरी आणि सागरी या घटकात विभागलेले आहेत. जव्हार हा तालुका इंग्रजांच्या कालखंडापासून त्या ठिकाणी प्रशासकीय कार्यालयांची स्थापना झालेली आहे, त्यांना विकासाच्या प्रवाहामध्ये आणण्याचे अनेक प्रयत्न शासनाच्या माध्यमातून झालेले आहेत, परंतु आजही जव्हार, मोखाडा, तलासरी,विक्रमगड सारख्या भागात राहणाऱ्या आदिवासींचा आपण जर साकल्याने विचार केला तर ते आजही विकासाच्या मुख्य प्रवाहात आपल्याला दिसत नाहीत. आजही दारिद्र्याच्या छायेखाली ते जीवन जगत आहेत. निरक्षरतेचे,व्यसनाचे,अंधश्रद्धेचे प्रमाण जास्त आहे,आणि महिलांची तर त्याहीपेक्षा अत्यंत आणि भयावह परिस्थिती आपणास दिसून येते.

कोणत्याही समाजाचा, देशाचा, कुटुंबाचा प्रगतीचे मूळ जर आपण शोधले तर त्या घरातील त्या देशातील स्त्रियांच्या प्रगतीवर अवलंबून असते. त्या देशाचे आणि कुटुंबाची प्रगती किती आहे, हे आपणास स्त्रियांची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक प्रगतीच्या आधारे तपासता येते निश्चितपणे सांगता येते. पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या संदर्भात सर्वांगीण विचार केला असता त्यांची अजूनही खूप मोठ्या प्रमाणामध्ये प्रगती झालेली नाही किंबहुना विकासाच्या मुख्य प्रवाहात ते आलेले नाहीत असे आपणास ठामपणे सांगता येईल. जव्हार तालुक्यातील स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण हे केवळ 41.41%, विक्रमगड तालुक्यात हेच प्रमाण 46.23%, तर वाडा तालुक्यात हेच प्रमाण 55.77% इतके आहे. अजून त्यातल्या त्यात आपण जर विचार केला तर आदिवासी महिलांचे शिक्षणातील प्रमाण हे अत्यल्प आहे. शासनाच्या निर्देशाप्रमाणे अनुसूचित गावांची संख्या पाहिली असता तालुक्यातील सर्वच्या सर्व गाव हे अनुसूचित गटात आहेत.

म्हणजेच विक्रमगड तालुक्यातील 94 गावे जव्हार तालुक्यातील 109 गावे तर वाडा तालुक्यातील 170 गाव. वाडा तालुक्यात जवळपास 58% लोक हे अनुसूचित जमातीतील आहेत तर जव्हार तालुक्यात अनुसूचित जमातीचे प्रमाण हे 91.64%, तर विक्रमगड तालुक्यात 91.82% इतके प्रमाण हे आदिवासी समाजाचे आहे.

विक्रमगड, वाडा, जव्हार या तिन्ही तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येचा विचार केला असता बहुसंख्य असलेली जी आदिवासी लोकसंख्या आहे ही विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांना विकासाचे

लाभ प्राप्त होण्यासाठी, त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी, कुपोषण प्रमाण होणे कमी होण्यासाठी, अंधश्रद्धेचे प्रमाण कमी होण्यासाठी, व्यसनाचे प्रमाण कमी होण्यासाठी या सगळयांवर एकच उपाय आहे, तो म्हणजे आदिवासी स्त्रियांना आर्थिक सक्षम बनवणे, आदिवासी स्त्रियांची आर्थिक साक्षरता वाढ करणे, तेव्हाच त्या कुटुंबाचा आणि त्या समाजाचा आर्थिक आणि सामाजिक विकास होऊ शकतो. या संशोधनाच्या माध्यमातून आदिवासींच्या समोर असलेले जे काही प्रश्न आहेत, हे प्रश्न सोडवण्याच्यासाठी त्यांना आर्थिक साक्षर होणं गरजेचं आहे, आर्थिक सक्षमता त्यांचे विकसित होणे गरजेचे आहे, या अनुषंगाने संशोधन करण्याची संशोधकाची दिशा आहे. सामाजिक स्तरीकरणातील एक मूलभूत घटक किंबहुना अविभाज्य घटक म्हणून स्त्री कार्यरत असते, आणि तीच जर आर्थिक व सामाजिकदृष्ट्या वंचित असेल, उपेक्षित असेल तर मात्र त्या समाजाची आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक प्रगती घडून येत नाही. म्हणून जर का आपल्याला आदिवासींचा आर्थिक, सामाजिक विकास करायचा असेल तर मूळ समस्येच्या बुडावरच घाव घालण्याची गरज आहे, आणि तो घाव म्हणजे आदिवासी स्त्रियांची सामाजिक आणि आर्थिक प्रगती घडून आणणे, त्यांच्या आर्थिक साक्षरता आणि आर्थिक सक्षमता विकसित करणे, अनेक आर्थिक उत्पन्नाची साधने उपलब्ध करून देणे. म्हणजेच आदिवासी समाजातील स्त्रियांना बँकांच्या माध्यमातून आर्थिक संपन्न आणि सक्षम करणे, तरच त्यांचा आर्थिक आणि सामाजिक विकास होऊ शकतो, असं या संशोधनाच्या माध्यमातून मला मांडायचे आहे.

बांगलादेशातील डॉक्टर मोहम्मद युनुस यांनी त्यांच्या देशातील स्त्रियांना आर्थिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महिलांची बँक सर्वप्रथम सुरू केली, आणि ही बँक कोणत्याही पद्धतीचे तारण न ठेवता, कोणत्याही पद्धतीचे जामीनदार न ठेवता स्त्रियांना कर्ज वितरित केले, आणि या कर्जाची 100% परतफेड संबंधित महिलांनी पूर्ण केली. हे सर्व शक्य केवळ गावागावात पाडापाड्यात,छोट्या स्वरूपात महिलांनी एकत्रित येऊन स्वयंसहायता बचत गटाची निर्मिती केली. स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातून डॉ. मोहम्मद इनुस यांनी खूप मोठी आर्थिक क्रांती बांगलादेशातील स्त्रियांच्या जीवनामध्ये आणली. त्यांचा जीवन स्तर मोठ्या पद्धतीने विकसित झाला, आणि आर्थिक साक्षरता आणि सक्षमता त्या देशातील स्त्रियांच्या बाबतीत झालेले बदल सर्व जगाने पाहिले. हाच धागा पकडून भारतात देखील ग्रामीण भागातील आदिवासी भागातील विशेषतः महिलांच्या जीवनात आर्थिक क्रांती आणण्यासाठी बचत गटाची फार मोठी भूमिका असल्याची नमूद करता येईल.

पालघर जिल्ह्यातील जवळपास सर्वच तालुक्यांमध्ये बचत गटाचे फार मोठे जाळे निर्माण झालेले आहे, आणि उत्तरोत्तर हे प्रमाण वाढत चाललेले आहे. या बचत गटाच्या माध्यमातून फार मोठ्या पद्धतीनं आर्थिक क्रांती आदिवासी स्त्रियांच्या जीवनात झाल्याचे आपल्याला आढळून आलेली आहे. विक्रमगड जव्हार वाडा यासारख्या

आदिवासी बहुल तालुक्यातील आदिवासी महिला आता बचत गटाच्या माध्यमातून खूप मोठा आर्थिक आणि सामाजिक परिणाम त्यांच्या दररोजच्या जीवनावरती झालेला आहे. तो परिणाम कशा पद्धतीचा आहे. त्या परिणामांचा अभ्यास करण्याच्या दृष्टिकोनातून हे संशोधन पुढे जाणार आहे. आदिवासी महिलांच्या जीवनात बचत गटाची काय भूमिका आहे बचत गटामुळे त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात काय बदल झाले त्यांच्या एकूण कुटुंबावर काय परिणाम झाले. या अनुषंगाने हे संशोधन केले जाणार आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टे: -**

1] पालघर जिल्ह्यातील आदिवासींच्या सामाजिक आणि आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.

2] पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनाचा अभ्यास करणे.

3] पालघर जिल्ह्यातील आदिवासी संस्कृतीचा अभ्यास करणे.

4] पालघर जिल्ह्यातील आदिवासीच्या जीवनमानाचा अभ्यास करणे.

5] पालघर जिल्ह्यातील आदिवासींची आर्थिक उत्पन्नाची साधने अभ्यासणे.

6] पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या विकासासाठी सूचना शिफारसी सुचवणे.

● **संशोधन गृहितके: -**

1] पालघर जिल्ह्यातील आदिवासींचा आर्थिक विकास अपेक्षित प्रमाणात झालेला नाही.

2] पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या अनेक आर्थिक समस्या आहेत.

3] पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या अनेक सामाजिक समस्या आहेत.

4] पालघर जिल्ह्यातील महिलासाठी मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध नाही.

5] पालघर जिल्ह्यातील महिलांमध्ये महिलांचा जीवनस्तर, राहणीमानाचा दर्जा निम्न आहे.

6] पालघर जिल्ह्यातील महिलांकडे उत्पन्नाची साधने अत्यंत मर्यादित आहेत.

7] पालघर जिल्ह्यातील महिलांचा बँकेच्या सवयी अत्यंत कमी आहेत.

● **संशोधन पद्धतीः-**

सदरचे संशोधन पूर्ण करण्याच्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही संशोधन साधनांचा वापर केला जाणार आहे. तसेच ग्रंथालयीन व ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा ही वापर सदरचे संशोधनाच्या साठी होणार आहे. तसेच प्रश्नावली,मुलाखती,प्रत्यक्ष भेटी, सर्वेक्षण, निरीक्षण इत्यादी संशोधन साधनांचा वापर करून हे संशोधन पूर्ण करण्याचा प्रयत्न संशोधकाच्या माध्यमातून होणार आहे.

■ **शोध आराखड्याची प्रकरण निहाय रचना: -**

सदरचे संशोधन पूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून नियोजनबद्ध दृष्टिकोनातून प्रकरण निहाय रचना खालील प्रमाणे केलेली आहे.

■ **प्रकरण 1**

- **संशोधन विषयाचे महत्त्वः**

सामाजिक शास्त्रातील कोणत्याही अनुषंगाने केलेले संशोधन हे अत्यंत महत्त्वपूर्ण आणि उपयुक्त असते, त्याला संशोधकांनी घेतलेल्या जी संशोधन समस्या आहे, ही अपवाद अजिबात नाही. सदरच्या संशोधनासाठीचा जो विषय आहे, तो आदिवासी महिलांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात बचत गटामुळे झालेला बदल हे अभ्यासणे आहे. मुळात स्त्रियांच्या सामाजिक व आर्थिक उत्थानासाठी सगळ्या पातळीवरून सार्वत्रिक प्रयत्न होत असतात. परंतु म्हणावा त्या पद्धतीने स्त्रियांचा आर्थिक व सामाजिक विकास झाल्याचे आपणास दिसून येत नाही. आणि त्यातल्या त्यात आदिवासी भागातील, डोंगर कपाऱ्यातील महिला, आदिवासी महिला या विकासापासून कोसो दूर आहेत. काही प्रमाणामध्ये सरकारच्या योजना, अनेक एनजीओच्या योजना यांच्यापर्यंत पोहोचतात परंतु त्याचे प्रमाण हे सर्वसमावेशक असत नाही, त्या सातत्याने त्यांना मिळत नाहीत, यामुळे या महिला आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये अजूनही मुख्य प्रवाहात आलेल्या नाहीत.

प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून आदिवासी भागातील डोंगर कपाऱ्यातील आदिवासी महिलांना आर्थिक व सामाजिक सन्मान मिळवून देणे, त्यांचे जीवनमान उंचावणे आणि त्यांचे सक्षमीकरण करणे, आर्थिक साक्षरता घडवून आणणे, अशा अनेक अंगाने हे संशोधन केले जाणार आहे. आदिवासी महिलांना अनेक शासकीय योजनांचा लाभ प्राप्त झाला पाहिजे,त्यांना बँकिंग प्रणाली समजली पाहिजे, बँकांची सवय लागली पाहिजे, सावकारी पासुन त्यांना मुक्तता मिळाली पाहिजे, (विशेषतः हे वीटभट्टी कामगारांच्या संदर्भात) वेटबीगारी सारख्या अमानवीय पद्धतीतून त्यांची मुक्तता होण्यासाठी बचत गट हे अत्यंत उपयुक्त आहेत, त्याच्या संदर्भात फार मोठी भूमिका बचत गटांनी निभवलेली आहे, छोटी मोठी उद्योगधंदे करण्यासाठी कर्ज मिळाले पाहिजे, प्रत्येक महिलेचे बँकेमध्ये बचत खाते असावे,म्हणजेच आर्थिक विकासाच्या प्रवाहात त्यांना घेऊन येण्याच्या दृष्टिकोनातून हे संशोधन अत्यंत उपयुक्त आहे, मार्गदर्शक आहे, म्हणून या विषयावर संशोधन होणे अत्यंत आवश्यक आहे.

आदिवासी आणि दुर्गम भागात राहणाऱ्या ज्या महिला आहेत, यांची शारीरिक स्थिती आरोग्याच्या दृष्टिकोनातून व्यवस्थित नाही. परंतु बचत गटामुळे फार मोठ्या प्रमाणामध्ये आज महिला आपल्या शारीरिक स्वास्थ्याकडे लक्ष देताना दिसून येत आहेत, आणि त्याबद्दल अधिक जागृत पद्धतीने आपल्या कुटुंबातील सदस्यांकडून सुद्धा लक्ष देत आहेत. हे प्रमाण वाढीस लागले पाहिजे, म्हणून या अनुषंगाने संशोधने अत्यंत आवश्यक आहे. आदिवासी महिला या जंगलात उपलब्ध असलेल्या अनेक जंगली वनस्पती आहेत, मध, डिंक, सागाची पाण, तेंदूची पानं, कात,अनेक औषधी वनस्पती अशा अनेक वस्तूंच चांगल्या पद्धतीची मार्केटिंग बचत गटांच्या माध्यमातून होत आहे. या माध्यमातून एक चांगल्या प्रकारचे पैसे आदिवासी महिलांना याच्या माध्यमातून प्राप्त होत आहेत. यात आणखीन वाढ कशा पद्धतीने करता येईल, यासारखे अनेक मॉडेल इतर आदिवासी बहुल गावांमध्ये, भागांमध्ये राबवता येतील, या अनुषंगाने देखील सदरचे संशोधन हे अत्यंत उपयुक्त असणार आहे,म्हणून या विषयाच्या अनुषंगाने आणखीन सर्वसमावेशक आणि प्रभावी पद्धतीने संशोधन करणे संशोधकाला गरजेचे वाटते.

केंद्र शासनापासून ते अगदी तालुकास्तर ग्रामपंचायत स्तरावर शासन महिला सबलीकरणासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. महिला सबलीकरण करण्यासाठी त्यांना सर्वप्रथम आर्थिकदृष्ट्या साक्षर आणि सक्षम बनवली तरच महिला सबलीकरण होऊ शकते असे संशोधकाला या ठिकाणी ठामपणे वाटते. मग त्यांना आर्थिक साक्षर आणि सक्षम कसं बनवायचं, तर सगळ्यात सोपा आणि खात्रीशीर मार्ग म्हणजे बचत गटांच्या माध्यमातून त्यांचे हात बळकट करणे, त्यांच्या हाताला काम देणे आणि त्यांच्या संदर्भातले असलेले सर्व आर्थिक व्यवहार त्यांनाच पार पाडायला लावणे, आणि ते संपूर्ण व्यवहार हे बँकेतूनच होतील ही संपूर्ण खबरदारी बाळगणे आणि जेव्हा किमान नऊ ते जास्तीत जास्त 15 महिला एकत्र येऊन एखादा बचत गट स्थापन करतात,तेव्हा त्यांच्यातील संघटन कौशल्य त्यांच्यातील एकता आणि त्यांच्यात असलेला एकत्रित समन्वय यांच्यातूनच एक सक्षम आणि आर्थिक दृष्ट्या सबल असलेली महिला पुढे येणार आहे, आणि एखादीच महिला पुढे येणार नसून तो संपूर्ण बचत गट पुढे येणार आहे. त्यामुळे निश्चितच त्या गावातील पाड्यातील इतर महिला देखील त्यांचे बघून फार मोठ्या पद्धतीने त्यांचा आदर्श घेऊन महिला सबलीकरणाची व्यापकता ही अत्यल्पकाळात खूप व्यापक पद्धतीने करता येऊ शकते. हे साध्य करण्यासाठी या विषयाच्या अनुषंगाने संशोधन करण्याची आवश्यकता संशोधकाला या ठिकाणी वाटते.

- **प्रकरण 2: संशोधन साहित्याचा आढावा.**

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाच्या अनुषंगाने इतरत्र कुठल्या प्रकारचे संशोधन झालेलं आहे याचा थोडक्यात आढावा घेण्यात येणार आहे.

- **प्रकरण 3: पालघर जिल्ह्यातील महिलांचे सामाजिक जीवन.**
- **प्रकरण 4: पालघर जिल्ह्यातील महिलांचे आर्थिक जीवन.**

■ प्रकरण 5: पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिला बचत गटाचा आदिवासी जीवनावर झालेले आर्थिक व सामाजिक बदल

■ प्रकरण 6: संशोधन निष्कर्ष आणि शिफारसी.

■ संदर्भ साहित्य सूची:

1) पालघर जिल्हा मार्गदर्शिका महाराष्ट्र शासन.

2)

संशोधक

श्री राहुल प्रकाश बनसोडे.

संशोधन मार्गदर्शक

श्री डॉ. माधव पी.पलमंटे